**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
**राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत**
**मंगळवार दि.०७/०१/२०२० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता**
**स्थळ - व्यवस्थापन परिषद कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ**

राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक मंगळवार, दि.०७/०१/२०२० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद कक्षामध्ये मा.कुलगुरु महोदया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्रं | राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती ( सन २०१८-१९ व सन २०१९-२० ) | पद |
|---|---|---|
| ०१ | **डॉ.मृणालिनी फडणवीस.,** मा.कुलगुरु महोदया, पु.अ.हो.सो.वि.सो. | अध्यक्ष |
| ०२ | **डॉ.विकास ल. कदम,** मा.प्रभारी प्र-कुलगुरु, पु.अ.हो.सो.वि.सो. | सदस्य |
| ०३ | **प्रा.डॉ.व्ही.बी.घुटे.,** मा.कुलसचिव, पु.अ.हो.सो.वि.सो. | सदस्य |
| ०४ | **सी.ए.श्रेणिक एस.शहा.,** मा.वित्त व लेखा अधिकारी, पु.अ.हो.सो.वि.सो. | सदस्य |
| ०५ | **डॉ.डी.कार्तिकेयन**, मा.क्षेत्रीय निदेशक, रासेयो क्षेत्रिय कार्यालय, पुणे | सदस्य |
| ०६ | **डॉ.अतुल साळुंके.,** मा.राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी, रासेयो | सदस्य |
| ०७ | **डॉ.शरद अ. बोराडे.,** मा. समन्वयक, रासेयो प्रशिक्षण केंद्र, अहमदनगर महाविद्यालय | सदस्य |
| ०८ | **डॉ. वसंत कोरे.,** मा.संचालक, विद्यार्थी विकास, पु.अ.हो.सो.वि.सो. | सदस्य |
| ०९ | **मा.प्राचार्य., डॉ.आबासाहेब देशमुख.,**शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज | सदस्य |
| १० | **मा.प्राचार्य.,डॉ.व्ही.पी.उबाळे.,** डी.बी.एफ दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर | सदस्य |
| ११ | **मा.प्राचार्य.,डॉ.एन.बी. पवार.,** श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा. | सदस्य |
| १२ | **मा. प्राचार्य., डॉ. बी. पी. रोंगे.,** कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर | सदस्य |
| १३ | **मा.प्रा.डॉ.सी.व्ही.ताटे.,** शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज | सदस्य |
| १४ | **मा.प्रा.ए.व्ही.साखरे.,** संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर | सदस्य |
| १५ | **श्री. शक्ती कोळेकर.,** संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर | सदस्य |
| १६ | **कु. सोनाली च.देवकर.,** लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महा. सोलापूर | सदस्य |
| १७ | **मा.जिल्हा दारुबंदी अधिकारी.,** जिल्हा अधिकारी कार्यालय, सोलापूर | सदस्य |
| १८ | **मा.डॉ. महेन्द्र घागरे.,** वृक्ष मित्र, पुणे | सदस्य |
| १९ | **डॉ.व्ही.सी.दंडे.,** रासेयो जिल्हा समन्वयक, डी.बी.एफ दयानंद कला व शास्त्र महा., सोलापूर | सदस्य |
| २० | **डॉ. डी.एस.नारायणकर.,** विभागीय समन्वयक.,एस.एस.ए.आर्टस् & कॉमर्स कॉलेज,सोलापूर | सदस्य |
| २१ | **डॉ.सी.बी.लोंढे .,** विभागीय समन्वयक., शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज | सदस्य |
| २२ | **डॉ. सी.एन.काळे .,** विभागीय समन्वयक., कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर | सदस्य |
| २३ | **डॉ. गुणवंत सरवदे.,** संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, पुअहोसोविसो. | सदस्य - सचिव |

**स्वागत :**

मा.संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्मानीय सदस्यांचे शब्द सुमनांने स्वागत केले.

**अभिनंदन** :

डॉ. अतुल साळुके, राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मा.कुलगुरु महोदया, आजी माजी संचालक, राष्ट्रीय सेवा योजना व वारी मार्गावरील महाविद्यालयाचे प्राचार्य व त्यांचे सहकारी या सर्वांचे आषाढी वारी - २०१९ उत्कृठ आयोजनाप्रित्यर्थ अभिनंदन केले.

**अनुपस्थिती :**

मा.श्री. रघु चव्हाण, सामाजिक कार्यकर्ता, सोलापूर, मा.कार्यकारी अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद, सोलापूर, मा.समन्वयक, नेहरु युवा केंन्द्र, सोलापूर, मा.प्रा.आर.एस.चाटी, श्री.शिवाजी महाविद्यालय, बार्शी, डॉ.अतुल कदम, के.एन.भिसे महाविद्यालय, कुर्डूवाडी, प्रा.जवाहर मोरे., संतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप हे रासेयो सल्लागार समिती सदस्य या बैठकीस अनुपस्थित होते त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

| | | |
|---|---|---|
| **विषय क्रमांक** | ०१ | दि.२७/०३/२०१४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे. |
| **ठराव क्रमांक** | ०१ | दि.२७/०३/२०१४ रोजी झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तात वाचून कायम करण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| **विषय क्रमांक** | ०२ | कार्यपूर्ती अहवाल |
| **ठराव क्रमांक** | ०२ | कार्यपूर्ती अहवालाची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| **विषय क्रमांक** | ०३ | सन २०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षातील राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा थोडक्यात आढावा.(सोबत-सन २०१८-१९ अहवाल ( मुद्देनिहाय ) व सन २०१९-२० आजतागायतचा अहवाल ( मुद्देनिहाय ) अवलोकनार्थ ) |
| **ठराव क्रमांक** | ०३ | सन २०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षातील राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा थोडक्यात आढावा व मुद्देनिहाय आजतागायतचा अहवाल या दोन्हींची नोंद घेण्यात आली. पुरग्रस्त लोकांना केलेली मदत याबाबत डॉ.अतुल साळुंके, मा.राज्य संपर्क अधिकारी यांनी विद्यापीठाचे विशेष अभिनंदन केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांमध्ये कौशल्य विकास केंद्राअंतर्गत राबविण्यात आलेल्या काही ठराविक उपक्रमांची जे की राष्ट्रीय सेवा योजना संबधित आहेत त्याची देखील नोंद घेण्याबाबत मा.कुलगुरु महोदया यांनी सुचित केले आणि सदरहू राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची सर्वांना माहिती दिली. |

| | | |
|---|---|---|
| **विषय क्रमांक** | ०४ | सन २०१८-१९ मधील विद्यार्थी संख्येचा आढावा व सन २०१९-२० मधील विद्यार्थी संख्येचा आढावा ( सोबत - सन २०१८-१९ व सन २०१९-२० मधील विद्यार्थी संख्येचा तपशिल अवलोकनार्थ ) |
| **ठराव क्रमांक** | ०४ | **अ)** सन २०१८-१९ मधील विद्यार्थी संख्येचा आढावा व सन २०१९-२० मधील विद्यार्थी संख्येचा आढावा घेण्यात आला तसेच अनुसुचित जमाती विद्यार्थी संख्येत वाढ होणेबाबत प्रयत्न करावेत असे सर्व संबधित महाविद्यालयांना कळवावे असे ठरले.<br>**ब)** मा. राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या कार्यालयाकडून या संबधात भारत सरकार (केंन्द्र शासन ) च्या संबधित विभागाकडे पत्रव्यवहार केलेला आहे .अनुसुचित जाती व जमाती रिक्त विद्यार्थी संख्या इतर या प्रवर्गातून भरणेबाबत मा.राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी , राष्ट्रीय सेवा योजना यांचेकडून लवकरच निर्णय विद्यापीठास कळविण्यात येईल. तद्नंतर विहित कार्यवाही करावी असे ठरले. |

| | | |
|---|---|---|
| **विषय क्रमांक** | ०५ | सन २०१८-१९ चे लेखे मान्यतेसाठी व सन २०१९-२० या वर्षाचे वार्षिक अंदाजपत्रक माहितीस्तव व मान्यतेस्तव सादर ( सोबत-सन २०१८-१९ चे लेखे व सन २०१९-२० चे अंदाजपत्रक अवलोकनार्थ ) |
| **ठराव क्रमांक** | ०५ | **अ)** सन २०१८-१९ चे लेखे व सन २०१९-२० या वर्षाचे वार्षिक अंदाजपत्रक याची नोंद घेण्यात आली. आर्थिक वर्ष २०२०-२१ चे राष्ट्रीय सेवा योजनेचे अंदाजपत्रक स्वतंत्र करावे असे ठरले.<br>**ब)** प्रस्तुत विद्यापीठ सन २०१८-१९ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये एस.टी.विद्यार्थी संख्येचे अनुदान जास्तीचे वितरीत केलेले दिसत आहे याबाबत वित्त व लेखा विभागाकडून सन २०१८-१९ च्या लेखापरीक्षण अहवालाचा सर्वप्रथम आढावा घेऊनच सन २०१९-२० चे अनुदान वाटप करावे प्रत्येक वर्षी अनुदान वाटप करत असताना वित्त व लेखा विभागाकडून अनुदान वाटप बाबतची काळजीपूर्वक सर्व तपासणी करुनच अनुदान वाटप करावे असे ठरले. याबाबत मा.कुलगुरु महोदया यांनी मा.वित्त व लेखा अधिकारी यांना पुढील कार्यवाही करण्याबाबत सुचित केले. |

| | | |
|---|---|---|
| **विषय क्रमांक** | ०६ | राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक अनुदान वाटप व लेखापरीक्षणाबाबत चर्चा |
| **ठराव क्रमांक** | ०६ | **अ)** राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक अनुदान वाटप व लेखापरीक्षणाबाबत सविस्तर चर्चा झाली. मा. राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी, यांनी महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठात प्रस्तुत प्रशासकीय कामकाज हे वित्त व लेखा विभागा मार्फत करण्यात येत आहे या धर्तीवर आपल्या विद्यापीठात ही वित्त व लेखा विभागाने हे प्रशासकीय कामकाज करावे असे सुचित केले.<br>**ब)** प्रस्तुत विद्यापीठ रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांचे व रासेयो विभागाचे नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर जमा व खर्चाचे लेखापरीक्षण स्वतंत्ररित्या न करता विद्यापीठाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाकडून करुन घ्यावे असे ठरले. |

| | | |
|---|---|---|
| **विषय क्रमांक** | ०७ | प्रति विद्यार्थी रुपये १०/- प्रमाणे जमा होणारे आपत्कालीन शुल्क व त्यावरील व्याजाच्या रक्कमेचा विनीयोग करण्याबाबत चर्चा करणे व त्यास मान्यता घेणे तसेच झालेल्या खर्चाचा आढावा घेणे व त्यास मान्यता घेणे ( सोबत-संबधित सर्व माहिती, ठराव, प्रशासकीय मंजुरी व शासन पत्र आणि निर्णय अवलोकनार्थ जोडलेले आहेत. ) |
| **ठराव क्रमांक** | ०७ | **अ)** राष्ट्रीय सेवा योजना विभागातंर्गत आपत्कालीन निधीवरील व्याजामधून तीन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा एकुण ०४ महाविद्यालयात घेण्यात आली याची नोंद घेण्यात आली.<br>**ब)** आर्थिक वर्ष सन २०२०-२१ साठी आपत्तकालीन शुल्क व त्यावरील व्याजाच्या रक्कमेचे विनीयोग करण्यासाठी दि.१९ ऑक्टोंबर, २०१३ च्या संबधित शासन निर्णयानुसार वित्त व लेखा समितीकडे सविस्तर विषय सादर करावा असे ठरले.<br>**क)** आपत्ती व्यवस्थापन साहित्य घेण्याकरिता प्रस्ताव मा. राजभवन कार्यालय, मुंबई येथे पाठविणे आवश्यक आहे परंतु तत्पुर्वी मा.विभागीय सहसंचालक कार्यालय,सोलापूर विभाग सोलापूर यांचेकडून याविषयी सविस्तर माहिती घेऊन पुढील कार्यवाही करावी असे ठरले. |

| | | |
|---|---|---|
| **विषय क्रमांक** | ०८ | राज्यस्तरीय शिबीराच्या आयोजनाबाबत चर्चा व मान्यता ( सोबत - शासन पत्र / नियमावली अवलोकनार्थ जोडलेली आहे ) |
| **ठराव क्रमांक** | ०८ | सविस्तर प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजूरीकरिता पाठवावा असे ठरले. |

| | | |
|---|---|---|
| **विषय क्रमांक** | ०९ | राष्ट्रीय सेवा योजना विविध उपक्रमासंदर्भात महाविद्यालयांचे मत व चर्चा |
| **ठराव क्रमांक** | ०९ | **अ)** महाविद्यालयाकडून राबविण्यात आलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे अहवाल महाविद्यालयाने तयार करुन संबधित महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीच्या मान्यतेअन्वये राष्ट्रीय सेवा योजना विभागास सादर करावा या महाविद्यालयाच्या अहवालाआधारे विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक स्मरणिका तयार करावी असे ठरले.<br>**ब)** महाविद्यालय निहाय सल्लागार समितीच्या वर्षातून किमान दोन बैठका घेणे अनिवार्य आहे प्रस्तुत बैठकीचा कार्यवृत्तात महाविद्यालय विकास समितीच्या शिफारसी अंती रासेयो विभागास (विद्यापीठास) पाठवावा असे ठरले.<br>**क)** महाविद्यालय निहाय सल्लागार समितीमध्ये विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक व रासेयो जिल्हा व विभागीय समन्वयक यांचा अंतर्भाव करावा व संबधितांना प्रस्तुत बैठकीसाठी आमंत्रित , निमंत्रित करावे असे ठरले. |

| | | |
|---|---|---|
| **विषय क्रमांक** | १० | राष्ट्रीय सेवा योजना नियमावली तयार करण्यासंदर्भात चर्चा व मान्यता (मराठी आवृत्ती ) |
| **ठराव क्रमांक** | १० | राष्ट्रीय सेवा योजना नियमावली तयार करण्यासंदर्भात समिती गठित करण्याचे अधिकार मा.कुलगुरु महोदया यांना देण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| **विषय क्रमांक** | ११ | मा.अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय |
| **ठराव क्रमांक** | ११ | **अ)** सन २०१७-१८ व सन २०१८-१९ राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा शासन स्तरावरुन घेण्याबाबत चर्चा झाली, लवकरात लवकर रासेयो राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा घेण्यात येईल असे मा.डॉ. अतुल साळुंके, राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी, रासेयो यांनी सांगितले.<br>**ब)** Self Finance Unit चालू करण्यासंदर्भात चर्चा झाली.<br>**क)** राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमाणपत्र स्वयंसेवकांना वितरीत करत असताना केंन्द्र शासनाच्या निकषानुसार वितरीत करावेत असे ठरले.<br>**ड)** सामाजिक संस्थेकडून राबविण्यात येणाऱ्या उपक्रसंदर्भात स्वयंसेवक पाठविण्याचे झाल्यास संबधित सामाजिक संस्थेसोबत MOU करणे आवश्यक आहे आणि तो करुन घ्यावा असे ठरले. |

**मा. अध्यक्ष व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.**

**डॉ. गुणवंत सरवदे**
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना
रा.से.यो सल्लागार समिती सदस्य - सचिव

**डॉ.मृणालिनी फडणवीस**
मा.कुलगुरु महोदया,
रा.से.यो.सल्लागार समिती अध्यक्षा